# A. 1 Maternal Health (माता आरोग्य)

## १.३ जननी सुरक्षा योजना

केंद्र शासनामार्फत राज्यातील ग्रामीण व शहरी आणि महानगरपालिका भागात जननी सुरक्षा योजना २००५-०६ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ शासकिय आरोग्य संस्थेत अथवा जननी सुरक्षा योजनेकरीता मानांकित करण्यात आलेल्या खाजगी आरोग्य संस्थेत प्रसूती झाल्यास देय आहे. सदरचा लाभ देण्याबाबतच्या मागदर्शक सुचना खालीलप्रमाणे आहेत. योजनेचे निकष :

• ग्रामीण भागातील रहिवासी असणा-या दारिद्रय रेषेखालील अनुसुचित जाती व अनुसूचित जमातीमधील गर्भवती मातेची प्रसूती ग्रामीण अथवा शहरी भागात शासकिय अथवा जननी सुरक्षा योजनेकरीता मानांकित करण्यात आलेल्या खाजगी आरोग्य संस्थेत झाल्यास सदर मातेस जननी सुरक्षा योजने अंतर्गत रु.७००/- याप्रमाणे लाभ देय राहिल. . शहरी भागातील रहिवासी असणा-या दारिद्रय रेषेखालील अनुसुचित जाती व अनुसूचित जमातीमधील गर्भवती मातेची प्रसूती ग्रामीण अथवा शहरी भागात, शासकिय अथवा जननी सुरक्षा योजनेकरीता मानांकित करण्यात आलेल्या खाजगी आरोग्य संस्थेत झाल्यास, सदर मातेस जननी सुरक्षा योजने अंतर्गत रु.६००/- याप्रमाणे लाभ देय राहिल. ग्रामीण व शहरी भागातील फक्त दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील गर्भवती मातेची प्रसूती घरी झाल्यास सदर मातेस जननी सुरक्षा योजने अंतर्गत रु.५००/- याप्रमाणे लाभ देय राहिल.

गर्भवती मातेस प्रसूती दरम्यान जननी सुरक्षा योजनेकरिता मानांकित करण्यात आलेल्या खाजगी आरोग्य संस्थेत तातडिने सिझेरियन शस्त्रक्रिया करणे गरजेचे झाल्यास अशा गर्भवती मातेस जास्तीत जास्त रु.१५००/- पर्यंतचा लाभ देय राहिल. सदरची रक्कम गर्भवती मातेस केलेल्या खर्चाच्या पावत्या सादर केल्यानंतर देय राहिल. • एकूण जननी सुरक्षा योजना निधिच्या ४ टक्के अनुदान हे जननी सुरक्षा योजनेसाठी लागणा-या प्रशासकिय खर्चासाठी देय राहिल.

• आशाच्या मानधनाची दोन प्रकारात विभागणी करण्यात आलेली आहे. १) जननी सुरक्षा योजनापात्र लाभार्थी गर्भवती माता प्रसूतीपूर्व तपासणी सेवा २) जननी सुरक्षा योजनापात्र लाभार्थीची शासकिय आरोग्य संस्थात्मक प्रसूती.

•ग्रामीण भागात जर आशा कार्यकर्तीने जननी सुरक्षा योजना पात्र लाभार्थीच्या प्रसुतीपूर्व सर्व तपासण्या पुर्ण करुन घेतल्या असतील तर आशाला रु. ३००/- व शहरी भागात जर लिंकवर्करने जननी सुरक्षा योजना पात्र लाभार्थीच्या सर्व प्रसूतीपूर्व तपासण्या पुर्ण करुन घेतल्या असतील तर त्याची खात्री करुन शहरी भागातील लिंक वर्करला रु.२००/- देण्यात यावेत. तथापि लाभार्थीस प्रसूतीपूर्व द्यावयाच्या सेवा दिल्याची जीओआय पोर्टल सॉफ्टवेअरमधील नोंदणीची खात्री केल्यानंतरच मानधन देण्यात यावे.